महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
**४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.**
**दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११**

email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

**जा.क्र. :**औसंवि/ब/नाट्यस्पर्धा/१२-१३/**१७०६३** दिनांक : **१९/०६/२०१२**

# परिपत्रक

**विषय :-** महावितरण कंपनी अंतर्गत सन २०१२-१३ च्या वार्षिक नाट्यस्पर्धा आयोजनाबाबत.

********

मा. व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी महावितरण कंपनी अंतर्गत सन २०१२-१३ करिता विविध स्तरावर नाट्यस्पर्धेच्या आयोजनाबाबत खालीलप्रमाणे मंजूरी दिलेली आहे.

**१) आंतर मंडलीय नाट्यस्पर्धा (Inter Circle Drama Competition)**

माहे सप्टेंबर २०१२ पर्यंत आयोजित करण्यात याव्यात.

**२) आंतर परिमंडलीय नाट्यस्पर्धा (Inter Zonal Drama Competition)**

आंतर परिमंडलीय नाट्यस्पर्धा नाशिक परिमंडळाच्या यजमानपदाखाली माहे डिसेंबर २०१२ च्या तिसऱ्या आठवड्यात आयोजित करण्यात येतील. तत्पूर्वी सर्व परिमंडळांनी आपआपल्या आंतर मंडलीय नाट्यस्पर्धा आयोजित करुन प्रथम क्रमांक प्राप्त नाटकाची प्रवेशिका विहीत नमून्यातील प्रपत्रात मुख्य अभियंता, नाशिक परिमंडळ, नाशिक यांच्याकडे दि. ३०/०९/२०१२ पर्यंत अथवा त्यापूर्वी पोहचेल अशा रितीने पाठवावी व त्याची एक प्रत सांघिक कार्यालयास सादर करावी.

**नाट्यस्पर्धा आयोजनासाठी आर्थिक तरतूद :**

अ) आंतर मंडलीय / आंतर परिमंडलीय नाट्यस्पर्धेत भाग घेणाऱ्या नाट्यसंघास नाटकाचा सराव व सादरीकरणासाठी अनुदान रक्कम रु. १५,०००/- (रु. पंधरा हजार मात्र) राहील.

ब) आंतर मंडलीय / आंतर परिमंडलीय नाट्यस्पर्धेसाठी यजमान मंडलास / परिमंडळास नाट्यगृहाचे भाडेपोटी प्रति नाटक अनुदान रक्कम रु. ७,०००/- (रु. सात हजार मात्र ) राहील.

क) आंतर मंडलीय / आंतर परिमंडलीय नाट्यस्पर्धेसाठी यजमान मंडलास / परिमंडळास नाटक सादरीकरण परवाना शुल्क, परीक्षकांचे मानधन, कलावंतानाचे स्नेहसंमेलन, नाट्यस्पर्धा उद्‌घाटन व पारितोषिक वितरण सोहळा इत्यादी साठी अनुदान रक्कम रु. ३०,०००/- (रु. तीस हजार मात्र) राहील.

सन २०१२-१३ पासून व त्यानंतर भौगोलिक परिक्षेत्रानुसार कंपनीच्या वार्षिक नाट्यस्पर्धा आयोजनासाठी निश्चित केलेली परिमंडळे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | परिमंडळाचे नांव |
|---|---|
| १ | सांघिक कार्यालय (भांडुप नागरी परिमंडळासह) |
| २ | कल्याण परिमंडळ (कोंकण परिमंडळ, रत्नागिरीसह) |
| ३ | अमरावती परिमंडळ, अकोला (औरंगाबाद परिमंडळासह) |
| ४ | कोल्हापूर परिमंडळ |
| ५ | पुणे परिमंडळ (बारामती परिमंडळासह) |
| ६ | लातूर परिमंडळ (नांदेड परिमंडळासह) |
| ७ | नाशिक परिमंडळ (जळगांव परिमंडळासह) |
| ८ | नागपूर परिमंडळ (नागपूर शहर परिमंडळासह) |

सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, सन २०१२-१३ करिता विविध स्तरावरील नाट्यस्पर्धेचे आयोजन वर दिलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात यावे तसेच स्पर्धा आयोजनानंतर स्पर्धेचा सविस्तर अहवाल १५ दिवसांच्या आत सांघिक कार्यालयास सादर करावा.

सदर परिपत्रकास व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी.

किशोर पवार

**(किशोर पवार)**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

**प्रत सादर :**
क्षेत्रीय कार्यालयातील सर्व मुख्य अभियंता.

**प्रत रवाना :**
१) क्षेत्रीय कार्यालयातील सर्व अधीक्षक अभियंता.
२) उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, भांडूप / बारामती / रत्नागिरी / लातूर / कोल्हापूर / अकोला / औरंगाबाद / नांदेड / नाशिक / कल्याण / पुणे / नागपूर / नागपूर शहर / जळगाव.
३) उप कामगार अधिकारी (क्रीडा), औरंगाबाद / जळगांव.

D:\SSPisey\NATYA KRIDA\12-13 Drama Competitiont.doc